पाणी अडवा, पाणी जिरवा, सुरक्षित भविष्य घडवा;
जलसंवर्धनासाठी लोकसहभाग आवश्यक - आ. गायकवाड
>> पान 2

येमन-सोमालियाजवळ समुद्री चाच्यांनी अपहरण
केलेल्या दोन जहाजांवरील २२ भारतीय सुरक्षित!
>> पान 3

तुपकरांचा पुन्हा एल्गार; २७ ऑगस्टला मुंबईत मंत्र्यांचे
बंगले-गाड्यांच्या प्रतीकात्मक लिलावाचा इशारा
>> पान 4

सुविचार
यशाचे शॉर्टकट नसतात, फक्त कष्टाचे रस्ते असतात.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 32 ■ शनिवार, दि. 22 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



जुळणार ललित प्रभाकर-प्राजक्ता माळीची रेशीमगाठ! 'शुभ मंगलम जोडी दंगलम'चा व्हिडिओ पाहाच
आतील पान

## मोदींच्या २५ वर्षांच्या राजकीय प्रवासाचा गौरव: भाजप साजरा करणार देशव्यापी 'सेवा संकल्प महोत्सव'

### गुजरातचे मुख्यमंत्री ते देशाचे पंतप्रधान, रक्तदान, आरोग्य शिबिरांसह मोदींच्या जीवनप्रवासाचे प्रदर्शन

दैनिक आपला विदर्भ




**नवी दिल्ली। वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण होणार आहेत. हा महत्त्वाचा टप्पा साजरा करण्यासाठी, भाजप देशव्यापी 'सेवा संकल्प महोत्सव' साजरा करणार आहे. भाजपच्या मते, हा कार्यक्रम एक देशव्यापी जनसंपर्क मोहीम आहे.

७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून प्रथम पदभार स्वीकारल्यापासून पंतप्रधान मोदी राजकारणात खंड न पडता सतत सक्रिय आहेत. त्यांनी जवळपास १३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि त्यानंतर गेल्या १२ वर्षांपासून भारताचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले आहे.

पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व या महोत्सवाची रूपरेषा निश्चित करण्यात पूर्णपणे व्यस्त आहे. भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन शनिवारी मोहिमेच्या तयारीचा सविस्तर आढावा घेणार आहेत. या महत्त्वाच्या बैठकीसाठी सर्व प्रदेशाध्यक्ष, संघटनांचे सरचिटणीस, राज्य प्रभारी आणि सह-प्रभारी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तळागाळातील स्तरावर उत्तम समन्वय साधणे हा यामागील उद्देश आहे.

**विनोद तावडे यांच्यावर जबाबदारी**

या राष्ट्रीय मोहिमेचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी, पक्षाने भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची राष्ट्रीय समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. प्रत्येक राज्यात एक सात सदस्यीय समिती तयार केले जाईल, ज्यात एक राज्यमंत्री, एक संघटना सरचिटणीस आणि इतर पाच ज्येष्ठ नेते असतील. ही समिती आपापल्या प्रदेशात कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख करेल. 'सेवा संकल्प महोत्सव' अंतर्गत, देशभरात सुमारे १५ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. पंतप्रधान मोदींच्या २५ वर्षांच्या सेवेचा आणि त्यांच्या विकासकामांचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमांचा उद्देश असेल. स्वच्छता मोहीम आणि रक्तदान शिबिरांसोबतच मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम आयोजित केली जाईल. जनतेच्या सोयीसाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील, जेणेकरून जनकल्याणाला प्राधान्य दिले जाईल.

'नरेंद्र मोदींची २५ वर्षे' या संकल्पनेवर एक विशेष डिजिटल आणि छायाचित्र प्रदर्शन देखील आयोजित केले जाईल. यामुळे तरुण पिढीला त्यांच्या राजकीय प्रवासाची आणि सुशासनाप्रती असलेल्या त्यांच्या वचनबद्धतेची ओळख होईल.

पंतप्रधान मोदींचा वाढदिवस १७ सप्टेंबर रोजी असतो. भाजप दरवर्षी या निमित्ताने 'सेवा पंधरवडा' साजरा करते. यंदा हा पंधरवडा २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. शनिवारच्या बैठकीत या पंधरवड्याच्या तयारीवर सविस्तर चर्चा होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दिशेने आधीच सूचना दिल्या असून, संघटना आता त्यावर पूर्ण वेगाने काम करत आहे. येत्या काही दिवसांत भाजपचे संपूर्ण लक्ष पंतप्रधान मोदींचे नेतृत्व, त्यांचे विकास मॉडेल आणि 'सेवा-संकल्प' या संकल्पनेवर असेल.

### डॉक्टरांसाठी 'नॅशनल मेडिकल रजिस्टर' नोंदणी पुन्हा अनिवार्य; 'एनएमसी'चा नवा मसुदा जारी



**नवी दिल्ली। वृत्तसंस्था :** राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने 'नॅशनल मेडिकल रजिस्टर'बाबत पुन्हा एकदा मोठा निर्णय घेतला आहे. देशातील कोणत्याही राज्यात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आणि परवाना मिळवण्यासाठी एनएमआर नोंदणी पुन्हा अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आयोगाने ठेवला आहे.

दोन वर्षांपूर्वी एनएमसीने आधुनिक वैद्यक व्यावसायिकांचा केंद्रीय डेटाबेस तयार करण्यासाठी एनएमआर अनिवार्य केले होते. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे ही यंत्रणा कार्यान्वित होण्यात अपयश आले होते. आता 'नोंदणी आणि वैद्यकीय व्यवसाय परवाना (सुधारणा) नियम, २०२६' च्या मसुद्यानुसार ही अट पुन्हा समाविष्ट करण्यात आली आहे.

तीन महिन्यांची मुदत : ज्या डॉक्टरांकडे नोंदणी नाही, त्यांनी तीन महिन्यांत ईएमआरबी वेब पोर्टलवर माहिती अद्ययावत करून नोंदणी क्रमांक व व्यवसायाचा परवाना घेणे बंधनकारक राहील.

**देशभरात एकच ओळख क्रमांक लागू**

नवीन प्रस्तावानुसार एथिक्स अँड मेडिकल रजिस्ट्रेशन बोर्डद्वारे हे राष्ट्रीय रजिस्टर सांभाळले जाईल. राज्य वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत प्रत्येक डॉक्टरला एक युनिक आयडेंटिफिकेशन क्रमांक दिला जाईल. हा एनएमआर क्रमांक भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी वैध ठरेल.

### विधानसभेआधी उत्तर प्रदेश सरकारचा मोठा निर्णय, ५२ प्रमुख नेत्यांना बुलेटप्रूफ जॅकेट्स, कारण काय?

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशात २०२७ च्या विधानसभा निवडणुकीआधी सुरक्षेच्या दृष्टीने राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. गृह मंत्रालयाने दिलेल्या सल्ल्यानुसार, राज्य सरकारने सुरक्षेचा अतिरिक्त उपाय म्हणून विरोधी पक्षनेते, कॅबिनेट मंत्री आणि इतर प्रमुख राजकीय नेत्यांसह तब्बल ५२ नेत्यांना बुलेटप्रूफ जॅकेट उपलब्ध करून दिली आहेत. उत्तर प्रदेशच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाय श्रेणीपासून ते झेड प्लस श्रेणीची सुरक्षा असलेल्या विविध पक्षांच्या नेत्यांना बुलेटप्रूफ जॅकेट्स पुरवण्यात आली आहेत.



संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर निवडण्यात आलेल्या ५२ नेत्यांमध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्ष व त्यांच्या मित्रपक्षांच्या नेत्यांसह विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांचाही समावेश आहे, यात अखिलेश यादव (समाजवादी पक्षाचे अध्यक्ष), मायावती (बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष), संजय निषाद (निषाद पक्षाचे अध्यक्ष व कॅबिनेट मंत्री), नंद गोपाल गुप्ता (कॅबिनेट मंत्री), अपर्णा यादव (राज्य महिला आयोगाच्या उपाध्यक्षा) आणि आकाश सक्सेना (रामपूरचे आमदार) यांचाही समावेश आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या काळात राजकीय नेत्यांच्या जाहीर सभा, रॅली, रोड शो आणि इतर सार्वजनिक कार्यक्रमांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. अशा वेळी मोठ्या संख्येने पोलीस ताफा तैनात करण्याचे सुरक्षा यंत्रणांसमोर आव्हान असते. हे लक्षात घेऊन गृह मंत्रालयाच्या शिफारशीनुसार राज्य सरकारने नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला आणि त्यानंतर ही प्रक्रिया राबवली.

## रोजगार मेळाव्याचा हॅट्रिक महासंकल्प

### २ हजार युवक-युवतींच्या हातात नोकरीचे नियुक्तीपत्र

### आ. सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद; ७० हून अधिक कंपन्यांचा सहभाग



**मेहकर : मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींच्या हाताला रोजगार देण्याच्या संकल्पाला मोठे यश मिळाले असून, आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रोजगार मेळाव्यात तब्बल २ हजार युवक-युवतींच्या नोकरीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे. मेहकर येथील कृषी वैभव लॉन्स येथे २० ऑगस्ट रोजी आयोजित या मेळाव्याला युवक-युवतींचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. उत्कर्ष फाउंडेशनच्या वतीने आयोजित या रोजगार मेळाव्यात ७० हून अधिक नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत तब्बल ४ हजार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.**



विशेष म्हणजे, आमदार सिद्धार्थ खरात यांच्या पुढाकारातून मतदारसंघात आयोजित करण्यात आलेला हा तिसरा रोजगार मेळावा आहे. यापूर्वीही दोन वेळा रोजगार मेळावे आयोजित करून हजारो युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे यंदाचा मेळावा हा रोजगार मेळाव्याची हॅट्रिक ठरला असून, या तिसऱ्या मेळाव्यात जवळपास २ हजार युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळाल्याने रोजगाराच्या महासंकल्पाला आणखी बळ मिळाले आहे.

मेळाव्यासाठी ३ हजार ८०० युवक-युवतींनी नोंदणी केली होती. कृषी, टाटा मोटर्स, ऑटोमोबाईल, बँकिंग, फायनान्स, आयटी, हेल्थकेअर यासह विविध क्षेत्रांतील कंपन्यांचा यात सहभाग होता. मेळाव्यात २ हजार युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळाली असून, ७०० जणांना ऑफर लेटर, तर पात्र उमेदवारांना जॉइनिंग लेटर देण्यात आले. ९०० युवक-युवती दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले असून, ४०० उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरले आहेत. आयटी क्षेत्रातही २५ विद्यार्थ्यांची निवड झाली. निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित कंपन्यांकडून पुढील प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





यावेळी बोलताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, ज्याला नोकरी पाहिजे, त्याला नोकरी मिळवून देण्याचा निर्धार केला आहे.'' यावर्षीचा रोजगार मेळावा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने घेण्यात आला असून, तीन हजारांहून अधिक युवक-युवतींची नोंदणी झाली आहे. चार हजार जागांसाठी मागणी असून, उर्वरित उमेदवारांनाही त्यांच्या पात्रतेनुसार विविध कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या युवक-युवतींना साडेतीन लाखांपासून साडेसात लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक पॅकेज उपलब्ध झाले. त्यामुळे मेहकर-लोणारसह हिंगोली, वाशिम, अकोला आणि जालना जिल्ह्यातून आलेल्या युवक-युवतींमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

विशेष म्हणजे, मतदारसंघातील युवकांना स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी मेहकर-लोणार मतदारसंघासह जिल्ह्यातील १५ महाविद्यालयांमध्ये कॅम्पस भरतीसाठी करार करण्यात आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून मतदारसंघात रोजगार मेळावे आयोजित करून युवकांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या ध्येय-धोरणानुसार ''८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण'' या विचाराला केंद्रस्थानी ठेवून युवकांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची भूमिका आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केली. राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्य युवकांच्या हाताला काम मिळावे आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

रोजगार मेळाव्याला नगराध्यक्ष किशोर गारोळे, प्रा, आशिष रहाटे उपजिल्हाप्रमुख शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख निंबाजी पांडव, युवा सेना तालुका प्रमुख अँड. आकाश घोडे, महिला आघाडी लोणार तालुका प्रमुख तारामती जायभाये, नगरसेवक महेश रिढे, प्रा. सतीश ताजणे, अमर घोडे, डॉ नंदकिशोर देशमुख, दत्ता घनवट, अँड. संदीप गवई, गोपाल गायकवाड, यांच्यासह विविध मान्यवर, कंपन्यांचे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने युवक-युवती उपस्थित होते. विविध कंपनी प्रतिनिधींनी मनोगत व्यक्त करून मेळाव्याच्या नियोजनाचे कौतुक केले.

नोकरी मिळालेल्या युवक-युवतींच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य हेच या रोजगार मेळाव्याचे खरे यश ठरले. सलग तिसऱ्या रोजगार मेळाव्यातून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आमदार सिद्धार्थ खरात यांच्या रोजगार महासंकल्पाची हॅट्रिक पूर्ण झाली आहे. रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल अनेक युवक-युवतींनी आमदार सिद्धार्थ खरात यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित धोटे यांनी केले.

# पाणी अडवा, पाणी जिरवा, सुरक्षित भविष्य घडवा; जलसंवर्धनासाठी लोकसहभाग आवश्यक - आ. गायकवाड

## ❊ 'महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटरला'उत्स्फूर्त प्रतिसाद ❊ मान्यवरांनी दाखवली हिरवी झेंडी

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा । प्रतिनिधी :** पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरविणे, पाणी वाहून जाऊ न देता त्याचे योग्य नियोजन करणे आणि जलसंधारणाच्या कामांना लोकसहभागाची जोड देणे आवश्यक आहे. पाणी, निसर्ग आणि पर्यावरणाचे संवर्धन झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहील, असे प्रतिपादन आमदार संजय गायकवाड यांनी केले.

जिजामाता प्रेक्षागार क्रीडा संकूल येथे जलसंधारण दिनानिमित्त आयोजित 'महा वॉकेथॉन वॉक फॉर वॉटर' रॅलीला हिरवी झेंडी दाखविल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी अजिंक्य घोडके, राजेंद्र पोळ, समाधान गायकवाड, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, मृद व जलसंधारणचे कार्यकारी अभियंता अमोल मुंडे, उपअभियंता अमोल जाधव, मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे सांगून आमदार गायकवाड म्हणाले की, पाण्याशिवाय निसर्ग आणि निसर्गाशिवाय मानवी जीवन शक्य नाही. त्यामुळे जलसंवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शासनाच्या जलसंधारणाच्या प्रयत्नांना नागरिकांनी सहकार्य करून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच प्रत्येकाने पिंपळ, वड, पिंपरी यांसारखी निसर्गपूरक किमान पाच झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार श्री. गायकवाड पुढे म्हणाले की, बुलढाणा व मोताळा क्षेत्रात नदी-नाल्यांचे खोलीकरण, जलसाठ्यांची निर्मिती, रिचार्ज स्ट्रक्चर आणि पाणी अडविण्याच्या विविध उपाययोजनांमुळे भूजल पातळी सुधारण्यास मदत झाली आहे. पाणी अडविल्यानंतर त्याच्या परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीतही वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

महावॉकथॉनच्या माध्यमातून पाणी वाचवा, पाणी अडवा आणि पाणी जमिनीत जिरवा, हा संदेश जनमानसात पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकसहभाग वाढल्यास आगामी काळात जिल्ह्याला दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास आमदार गायकवाड यांनी व्यक्त केला.

**जलसंवर्धनाची शपथ**

महावॉकेथॉनच्या माध्यमातून 'पाणी वाचवा, पाणी अडवा आणि पाणी जमिनीत जिरवा' हा संदेश जनमानसात पोहोचविण्यात आला. कार्यक्रमात सहभागी मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांनी जलसंवर्धनाची शपथ घेतली. जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग वाढविण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

जिजामाता प्रेक्षागार क्रीडा संकुलातून वॉकेथॉनला सुरुवात माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून आयोजित महा वॉकेथॉनला बुलढाणाकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिजामाता क्रीडा संकुल येथून रॅलीला सुरुवात झाली. तहसील चौक, चिंचोले चौक मार्गे पुन्हा जिजामाता क्रीडा संकुल येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

या पदयात्रेत शहरातील विविध शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक-विद्यार्थी, क्रीडाप्रेमी, प्रतिष्ठित नागरिक तसेच अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांना त्यांनी शुभेच्छा देत विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच जलसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संकल्प प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात कृतीत उतरवावा, असे आवाहन केले.

# राज्यातील आदिवासी आश्रम शाळांमधील दुरवस्था गंभीर

राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील दुरवस्था ही पाचवीला पूजलेली समस्या बनली आहे. दुर्गम, डोंगराळ, आदिवासीबहुल भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी या आश्रमशाळांची स्थापना करण्यात आली. जुन्या मुंबई राज्यात १९५३-५४ च्या सुमारास सर्वप्रथम आदिवासी आणि विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या मुलांसाठी आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. शासनाने १९७२-७३ पासून राज्यभरात मोठ्या प्रमाणावर आश्रमशाळा सुरू करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी केली. दुर्गम भागातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी घरापासून दूर जावे लागू नये आणि त्यांना राहण्या-खाण्याची मोफत सोय एकाच ठिकाणी मिळावी, या हेतूने शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांचे जाळे विणण्यात आले. सुरुवातीला या शाळा प्राथमिक स्तरावर होत्या. काळानुरूप त्यांचा विस्तार माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत केला गेला. सध्या या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित स्वरूपात ५५६ आश्रमशाळा चालविल्या जातात. पैकी ३७ प्राथमिक म्हणजे इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत, तर ३१९ माध्यमिक म्हणजे १ ली ते १० वीपर्यंत आहेत. माध्यमिक आश्रमशाळांशी संलग्न २०० कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. यात सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिकताहेत. त्यातील १ लाख ४० हजार २५४ मुले आणि १ लाख २१ हजार ५८२ मुली आहेत. या शाळांच्या व्यवस्थापनात आणि पायाभूत सुविधांतील त्रुटी, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि आरोग्याचे प्रश्न यामुळे येथील मुला-मुलींच्या सुरक्षिततेचा मुद्दा वेळोवेळी ऐरणीवर आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात जपतलाई येथील आश्रमशाळेत तीन चिमुकल्या मुलींचा सर्पदंशाने मृत्यू झाला. सरकारी यंत्रणेच्या अक्षम्य दुर्लक्षाचा आणि संवेदनहीनतेचा बळी म्हणून या चिमुकल्यांच्या मृत्यूकडे पाहिले पाहिजे. ज्या ठिकाणी समाजातील वंचित घटकातील मुले शिक्षणाची स्वप्ने पाहत सुरक्षित निवाऱ्याच्या आशेने येतात, त्याच ठिकाणी त्यांचा असा करुण अंत व्हावा, हे अत्यंत वेदनादायी आहे. व्यवस्था किती पोकळ आहे, हे सांगण्यासाठी मृत मुलींच्या पालकांच्या डोळ्यांतील अश्रू पुरेसे आहेत. या आश्रमशाळांच्या परिसरात सापांची बिळे, विटांचे ढिगारे आणि सर्वत्र साचलेले सरपण असे चित्र दिसते. स्वच्छतेचा अभाव आणि परिसराची दुरवस्था यामुळे सापांना तिथे आश्रय मिळणे स्वाभाविक आहे. आश्रमशाळेत नियमांचे उल्लंघन करून प्रवेश दिले जात असल्याचे समोर आले आहे. कागदावर विद्यार्थी संख्या वाढवून सरकारी अनुदान लाटण्याचे प्रकारही घडले आहेत. मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ही आश्रमशाळा सरकारी अनुदान घेत असूनही शिक्षक, वॉर्डन तसेच इतर आवश्यक सुविधा पुरवत नसल्याचे नमूद केले होते. एका पाहणीनुसार, गेल्या दोन वर्षांत २२ प्रकल्पांमध्ये ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या २००२ ते २०१२ या दहा वर्षांत ७९३ आदिवासी विद्यार्थ्यांचा आश्रमशाळांमध्ये मृत्यू झाला होता. हे मृत्यू गंभीर आजार, अपघात, गळफास किंवा सर्पदंशामुळे होत आहेत. निवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी बेडची शिफारस केलेली आहे; पण जवळपास ५० टक्के आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना जमिनीवरच झोपावे लागते. राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी वयाची अट निश्र्चित केली आहे. याचा फटका दुर्गम भागातून येणाऱ्या व शिक्षणात उशीर झालेल्या विद्यार्थ्यांना बसत आहे. तीव्र विरोधानंतर वयोमर्यादेत काही बदल केले, तरी या अटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये अनिश्र्चिततेचे वातावरण आहे. आर्थिक, कौटुंबिक किंवा आरोग्यविषयक कारणांमुळे ज्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही काळ खंड पडला, अशांना प्रवेश मिळण्यात अडचणी निर्माण करणाऱ्या कडक तरतुदी या निर्णयामध्ये आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही आंदोलन, सामाजिक-विद्यार्थी संघटनांच्या कार्यात सहभाग घेऊ नये, अशा अटी लादल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे. सलग तीन महिने ७० टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती असल्यास प्रवेश रद्द करण्याची तरतूद यात आहे. या पार्श्र्वभूमीवर केवळ मृत मुलींच्या पालकांना मदत देऊन किंवा आश्र्वासने देऊन किंवा एखादी आश्रमशाळा बंद करून हे प्रश्र्न सुटणार नाहीत. सरकारला खरोखरच आदिवासी समाजाचा विकास साधायचा असेल, तर जमिनीवरील स्थिती सुधारायला हवी. आश्रमशाळांत स्वच्छ पाणी, उत्तम आरोग्य सुविधा आणि सुरक्षित वातावरण पुरवले पाहिजे. अनेक आश्रमशाळांनी दहावी-बारावी बोर्ड परीक्षांमध्ये सलग शंभर टक्के निकालाची परंपरा राखली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण परिस्थितीवर मात करत उच्च गुण मिळवलेत. डहाणू किंवा मेळघाट येथील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन आणि क्रीडा स्पर्धांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. सौरऊर्जेवरील छोटी यंत्रे बनवणे, शालेय स्तरावर वैज्ञानिक उपक्रमात येथील विद्यार्थ्यांनी ठसा उमटवला आहे. हजारो आदिवासी मुलामुलींना शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणण्यात आश्रमशाळांचे योगदान मोठे आहे. त्यामुळे गंभीर त्रुटी समोर आल्याने या शाळा बंद करणे हा पर्याय व्यवहार्य नाही. मे महिन्यात आदिवासी विकास विभागामार्फत स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या ५ प्राथमिक आश्रमशाळांचे माध्यमिक स्तरावर, तर १९ माध्यमिक आश्रमशाळांचे कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. आवश्यक पदनिर्मिती आणि खर्चाची तरतूद करण्यासही मान्यता दिली. दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागू नये, हा यामागील उद्देश. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने अनेक आदिवासी कुटुंबांना मुलांच्या पुढील शिक्षणाचा खर्च आणि दूरच्या ठिकाणी राहण्याचा भार पेलत नाही. परिणामी, अनेक विद्यार्थी शिक्षण सोडतात. मुलींच्या शिक्षणावर याचा अधिक परिणाम होतो. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगानेही अनुदानित आश्रमशाळांना प्रोत्साहन देण्याची शिफारस केली आहे; मात्र शाळांचा दर्जा वाढवितानाच पात्र आणि पुरेसे शिक्षक, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक सुविधा, क्रीडा साधने, सुरक्षित वसतिगृह, स्वच्छतागृहे आणि पौष्टिक आहार अशा मूलभूत सुविधा सक्षम करणे आवश्यक आहे. दशकभरापूर्वी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या पाहणीत राज्यातील आश्रमशाळांमध्ये ज्या त्रुटी उघडकीस आल्या, त्या आजही तशाच असतील, तर आपली व्यवस्था आदिवासी मुलांच्या शिक्षणाबाबत संवेदनशील आहे, असे कसे म्हणता येईल?

# ममता बॅनर्जींवर टीकास्त्र, सुवेंदू अधिकारी यांचं कौतुक, गृहमंत्री सिलीगुडीमधील कार्यक्रमात काय म्हणाले?

दैनिक आपला विदर्भ



**सिलीगुडी। वृत्तसंस्था :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह २ दिवसीय पश्र्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. शाह यांनी या दौऱ्यातील पहिल्या दिवशी शुक्रवारी (२१ ऑगस्ट) जवळपास १८९ कोटी रुपयांच्या अनेक नवीन प्रशासकीय आणि निवासी प्रकल्पांचं भूमिपूजन केलं. सिलीगुडीच्या राणीडांगा इथल्या सशस्त्र सीमा बल (डडइ) नॉर्थ बंगाल फ्रंटीयर मुख्यालयात या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. अमित शाह यांनी कार्यक्रमादरम्यान उस्ताद बिस्मिल्ला खान आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कल्याण सिंह यांना आदरांजली अर्पण केली. तसंच शाह यांनी माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर टीका केली. सोबतच शाह यांनी विद्यमान मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचं कौतुक केलं.

'भारत माता की जय' म्हणत भाषणाची सुरुवात :- गृहमंत्र्यांनी या कार्यक्रमात 'भारत माता की जय' असं म्हणत आपल्या भाषणाची सुरुवात केली. तसंच हा दिवस माझ्यासाठी संस्मरणीय असल्याचं शाह यांनी म्हटलं. तसंच शाह यांनी या दरम्यान दिग्गज संगीतकार उस्ताद बिस्मिल्ला खान आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कल्याण सिंह यांना पुण्यतिथीनिमित्ताने आदरांजली अर्पण केली.

अमित शाह यांचा आधीच्या सरकारवर निशाणा : शाह यांनी भाषणादरम्यान मागील सरकारवर टीका केली. तसंच शाह यांनी पायाभूत सुविधांच्या विकासावरुन विद्यमान सरकारचं कौतुक केलं. केंद्रीय यंत्रणांना सिलिगुडी कॉरिडॉर मजबूत करण्यासाठी जवळपास ५६० एकर जमिनीची गरज होती. तसंच घुसखोरी रोखण्यासाठी सीमेवर काटेरी तारांचे कुंपण उभारणं महत्त्वाचे होतं. मात्र माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सरकारच्या विनंतीनंतरही जागा उपलब्ध करुन दिली नाही, असं म्हणत शाह यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर टीका केली.

सुवेंदू अधिकारी यांचं कौतुक :- नवे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी पदभार स्वीकारताच राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य दिलं. राज्य सरकारच्या स्थापनेनंतरच्या अवघ्या ४५ दिवसांत त्यांनी बीएसएफ आणि एसएसबीच्या जमिनीसंबंधीच्या समस्या सोडवल्या. तसंच १ हजार १२९ एकर जमीन सुपूर्द केली. तसंच लवकरच उर्वरित २९ एकर जागेसाठी मंजुरी दिली जाईल, असं आश्र्वासनही सुवेंदू अधिकारी यांनी दिलं, असं म्हणत शाह यांनी मुख्यमंत्र्याचं कौतुक केलं.

# जुळणार ललित प्रभाकर-प्राजक्ता माळीची रेशीमगाठ! 'शुभ मंगलम जोडी दंगलम'चा व्हिडिओ पाहाच

**मुंबई । प्रतिनिधी :** तब्बल १३ वर्षांनंतर मराठी अभिनेता ललित प्रभाकर आणि प्राजक्ता माळी यांची पुन्हा केमिस्ट्री जुळणार आहे. या दोघांच्या जोडीने छोट्या पडद्यावर जुळून येती रेशीमगाठी मालिका गाजवली होती. आता ही जोडी नव्या प्रेमकहाणीसह पुन्हा मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. 'शुभ मंगलम जोडी दंगलम' या चित्रपटातून ही गोड जोडी भेटीला येतेय. नुकतीच या चित्रपटाची सोशल मीडियावर घोषणा करण्यात आलीय. प्राजक्ता माळीने चित्रपटाचा टीझर शेअर करत खास कॅप्शनही लिहिलीय.

हंपी, चि. व सौ. का, आनंदी गोपाळ अशा चित्रपटातून आपले वलय निर्माण करणारा अभिनेता ललित आणि टीव्ही मालिका, चित्रपट आणि महाराष्ट्राची हास्यजत्रेमधून घराघरात पोहोचलेली प्राजक्ता नवी कोरी प्रेम कहाणी घेऊन येताहेत. इतक्या वर्षांनंतर त्यांची झालेली ही ऑनस्क्रीन भेट निश्र्चितच खास ठरणार आहे. विशेष म्हणजे 'शुभ मंगलम जोडी दंगलम'ची पहिली झलकच खूप दमदार आणि प्रभावी ठरलीय. ही जोडी यावेळी नेमकी कोणती प्रेमकहाणी घेऊन येतेय, याची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

ज्युबिलंट फिल्म्स स्टुडिओ निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रतीक पाटील करत आहेत. ललित प्रभाकर, प्रतीक पाटील आणि इरावती कर्णिक यांनी पटकथा लिहिली असून, संवाद इरावती कर्णिक यांचे आहेत. नितीन प्रकाश वैद्य आणि अश्र्विनी ब्रह्मनाथकर या चित्रपटाचे निर्माते आहेत.

# शिवसेना यूबीटी नगरसेवक विशाखा राऊतांचं जात प्रमाणपत्र रद्द; दबावामुळे प्रशासनानं निर्णय घेतल्याचा विरोधकांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेना यूबीटीला खूप मोठा धक्का बसला आहे. याचं कारण म्हणजे मुंबईच्या माजी महापौर आणि दादरमधील १९१ नंबरच्या वार्डमधून निवडून आलेल्या विशाखा राऊत यांचे कुणबी जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आलं आहे. पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं हे प्रमाणपत्र रद्द केलं आहे. यामुळे भविष्यात लवकरच विशाखा राऊत यांचं नगरसेवक पद रद्द होण्याची शक्यता आहे.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सदा सरवणकर यांच्या कन्या प्रिया सरवणकर यांनी विशाखा राऊत यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. दादर भागात असल्यामुळे ठाकरेंसाठी ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची होती. मिळालेल्या माहितीनुसार, विशाखा राऊत यांच्या जात प्रमाणपत्राचा विषय आता लवकरच महानगरपालिकेच्या सभागृहासमोर येणार आहे. यानंतर नगरसेवक पदाबाबत अंतिम निर्णय होईल. पीठासीन विशाखा राऊत यांच्या नगरसेवक पदाविषयीचा निर्णय जाहीर करतील. विशाखा राऊत यांनी आपल्याकडे आजोबांच्या काळापासूनचे जात प्रमाणपत्र नोंदणी असल्याचं मुंबई महापालिकेत माध्यमांशी बोलताना सांगितलं.

यावेळी बोलताना नगरसेविका विशाखा राऊत म्हणाल्या की, संबंधित अधिकाऱ्यांवर प्रचंड दबाव होता. गेल्या महिन्याभरापासून सदा सरवणकर मुंबई महानगरपालिकेमध्ये माझी मुलगी नगरसेविका म्हणून येत असल्याचं सांगत आहेत. त्यांना निकाल आधी कसा माहीत आहे? माझ्याकडे १९११ पासूनचे पुरावे आहेत. मोडी लिपीतले पुरावे आहेत. मला न्याय मिळेल याचा मला विश्र्वास आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून दबाव टाकला जात आहे.

आता जर विशाखा राऊत यांचे नगरसेवक पद रद्द झालं तर दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या प्रया सरवणकर यांना उर्वरित काळासाठी नगरसेवक पदाची संधी मिळू शकते. यामुळे भविष्यातील लढाई विशाखा राऊत कशाप्रकारे लढतात हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. तर दुसरीकडे शिवसेनेचे गटनेते अमेय घोले म्हणाले की, जो निकाल देण्यात आला आहे, तो कोणत्याही दबावामुळे देण्यात आलेला नाही. संबंधित समिती अतिशय निरपेक्ष भावनेनं निर्णय देत असते. कागदपत्र सादर केले नसतील म्हणून कारवाई झाली आहे. त्यांनी त्यांचा अभ्यास केला नव्हता, म्हणून त्यांची ही गत झाली आहे.

महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, सरकारी दबावामुळेच प्रशासनाला हा निर्णय घ्यावा लागला आहे. नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्राचा निकाल कित्येक वर्ष लागत नाही, आपण पाहिलं आहे. मात्र, राऊत यांचा निकाल लगेच लागला. असं जरी असलं तरीदेखील आम्ही शिवसैनिक आहोत. आम्ही संघर्ष करणारे आहोत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### बँक खाती कमिशनवर देणाऱ्या सायबर टोळीचा पर्दाफाश; चौघे जेरबंद, २.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आपला विदर्भ

**सातारा । प्रतिनिधी** : सायबर गुन्हेगारांना बँक खाती, एटीएम कार्ड व सिमकार्ड उपलब्ध करून देत फसवणुकीच्या पैशांचे हस्तांतरण करणाऱ्या चौघांच्या टोळीला सातारा सायबर पोलिसांनी जेरबंद केले. कोरेगाव येथील तिळगंगा नदी पुलाजवळ सापळा रचून पोलिसांनी ही कारवाई केली. आरोपींकडून मोबाईल, एटीएम कार्ड, सिमकार्ड, कागदपत्रे, बुलेट व रोख रक्कम असा एकूण २ लाख ३४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. १.५ ते ३ टक्के कमिशनचे आमिष दाखवून नागरिकांकडून बँक खाती, एटीएम/डेबिट कार्ड व सिमकार्ड घेतले जात होते. ही खाती पुढे सायबर गुन्हेगारांना फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी व हस्तांतरित करण्यासाठी दिली जात असल्याचे तपासात समोर आले.

आरोपींनी पुरवलेल्या विविध बँक खात्यांवर महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, गुजरात व उत्तर प्रदेशातील ३५ हून अधिक सायबर फसवणुकीच्या तक्रारी असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी व च्या माध्यमातून मुख्य सायबर सूत्रधारांच्या संपर्कात असल्याचेही समोर आले.

पोलिसांनी नागरिकांना बँक खाते, एटीएम कार्ड, पासबुक किंवा सिमकार्ड अनोळखी व्यक्तींना वापरण्यासाठी देऊ नये, असे आवाहन केले असून सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या भारत दौऱ्यावरून गोंधळ, राष्ट्रपती भवनाने अवघ्या तासाभरातच स्वागत संदेश मागे घेतला!

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांच्या भारत दौऱ्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. भारतीय राष्ट्रपती भवनाने एक निवेदन जारी करून 'चेंज ऑफ गार्ड' सोहळा रद्द केल्याची घोषणा केली, जेणेकरून बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांच्या औपचारिक स्वागतासाठी पूर्ण सराव करता येईल. तथापि, ही घोषणा नंतर मागे घेण्यात आली, ज्यामुळे या उच्चस्तरीय दौऱ्याच्या स्थितीबद्दल अधिक संभ्रम निर्माण झाला आहे. १२-१३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्र्वभूमीवर नवी दिल्ली आणि ढाका यांच्यातील सुरू असलेल्या राजनैतिक तणावाचे हे निवेदन मागे घेणे द्योतक आहे.

पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाच्या बांगलादेशच्या अलीकडील मागणीमुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले आहेत. राष्ट्रपती भवनाने एका नवीन निवेदनात म्हटले आहे, या शनिवारी, २१ ऑगस्ट २०२६ रोजी 'चेंज ऑफ गार्ड' सोहळा होणार नाही' या संदर्भात जारी केलेले प्रसिद्धीपत्रक मागे घेण्यात आले आहे. बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या औपचारिक स्वागताच्या पूर्ण सरावाला वाव देण्यासाठी आठवडाभर चालणारा सोहळा रद्द केल्याची घोषणा राष्ट्रपती भवनाने केल्यानंतर एका तासाने हे निवेदन आले. यापूर्वी मागे घेण्यात आलेल्या निवेदनात म्हटले होते, बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या औपचारिक स्वागताच्या पूर्ण सरावामुळे, या शनिवारी (२२ ऑगस्ट) राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात गार्ड बदलण्याचा सोहळा होणार नाही. यामुळे असा समज निर्माण झाला होता की, बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान येत्या रविवारी भारताला भेट देतील. पण अवघ्या एका तासानंतर, राष्ट्रपती भवनाने हा संदेश मागे घेतला आहे.

### अन् क्षणात होत्याचं नव्हतं झालं! मसूरीत पावसाचा हाहाकार, भूस्खलनात घर, दुकान कोसळलं

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** उत्तराखंडमधील मसूरीमध्ये मुसळधार पाऊस आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे ठिकठिकाणी भूस्खलनाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शुक्रवारी टिहरी जिल्ह्यातील मसूरी-कॅम्पटी रोडवर एक मोठी दुर्घटना घडली. सांझा दरबारजवळ भूस्खलनामुळे एक घर आणि दुकान कोसळलं. काळजाचा ठोका चुकवणारा हा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.दुर्घटना घडली तेव्हा कुटुंबातील सर्व सदस्य घरातच होते. मात्र जमिनीला तडे जात असल्याचं त्यांच्या लक्षात आलं तेव्हा त्यांनी जराही वेळ न घालवता घराबाहेर धाव घेत स्वतःचा जीव वाचवला. ते बाहेर पडल्यानंतर काही वेळातच संपूर्ण घर कोसळलं. घराशेजारी असलेलं दुकानही पूर्णपणे उद्ध्वस्त झालं.

# येमन-सोमालियाजवळ समुद्री चाच्यांनी अपहरण केलेल्या दोन जहाजांवरील २२ भारतीय सुरक्षित!

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था :** येमन आणि सोमालियाच्या किनारपट्टीजवळ घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये समुद्री चाच्यांनी दोन व्यापारी जहाजांचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. या जहाजांवर एकूण ३० कर्मचारी असून, त्यापैकी २२ जण भारतीय नागरिक आहेत, अशी माहिती जहाजबांधणी मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानं शुक्रवारी (२१ ऑगस्ट) दिली. दरम्यान, या घटनेची माहिती देताना संबंधित अधिकाऱ्यानं पीटीआय या वृत्त संस्थेला सांगितलं की, सर्व भारतीय कर्मचारी सुरक्षित आहेत.

२० ऑगस्टला अपहरण : येमनच्या किनाऱ्यापासून सुमारे ३० नॉटिकल मैल अंतरावर अदनच्या



आखातात एरिट्रियाचा ध्वज असलेल्या 'एमटी सिबू १' (चढ डळर्ली १) या तेल उत्पादने वाहून नेणाऱ्या टँकरचे २० ऑगस्टला सशस्त्र चाच्यांनी अपहरण केले. या जहाजावर १६ भारतीय, तसंच सीरिया, सुदान आणि इराकचे प्रत्येकी एक नागरिक आणि एका नागरिकाचं राष्ट्रीयत्व अद्याप निश्र्िचत झालेले नाही, असे एकूण २० जण होते, अशी माहिती अधिकाऱ्यानं दिली.

रिक्रूटमेंट अँड प्लेसमेंट सर्व्हिस लायसन्स एजन्सी - एस के एस कृषी मरीन सर्व्हिस (ओपीसी) प्रायव्हेट लिमिटेडनं दिलेल्या माहितीनुसार, सध्या जहाजावर सहा सशस्त्र समुद्री चाचे (पायरेट्स) आहेत आणि त्यांनी जहाजाचा ताबा घेतला आहे, असंही त्यांनी सांगितलं. पुढं त्यांनी सांगितलं की, आरपीएसएलला घटनेचा अहवाल आणि त्यानंतरचे नियतकालिक अद्ययावत तपशील तपासणी आणि नोंदीसाठी ई-नाविक ऑनलाइन सागरी अपघात अहवाल प्रणालीद्वारे सादर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दुसरी घटना १७ ऑगस्टला घडली : दुसरी घटना १७ ऑगस्टला सोमालियाच्या पुंटलँड किनाऱ्याजवळ घडली. या आठवड्याच्या सुरुवातीला सोमालियाच्या पुंटलँड किनारपट्टीजवळ तुर्की शस्त्रास्त्रं वाहून नेणाऱ्या एका मालवाहू जहाजाचे समुद्री चाच्यांनी अपहरण केलं. या जहाजावरील सहा भारतीयांसह किमान १० कर्मचारी समुद्री चाच्यांच्या ताब्यात असल्याची माहिती एका सोमाली अधिकाऱ्यानं गुरुवारी दिली. पुंटलँडमधील ईल जिल्ह्यातील मारेया भागापासून सुमारे ३.५ नॉटिकल मैल अंतरावर, कॅमेरूनचा ध्वज असलेल्या 'एम/व्ही लुटुफ' या जहाजाचा ताबा सोमवारी घेण्यात आला, अशी माहिती एका अधिकाऱ्यानं दिली.

जहाजावर १० सदस्यांचा क्रू : हे जहाज हायजॅक करण्यात आले, तेव्हा त्यावर तुर्की बनावटीची शस्त्रे आणि इतर साहित्य होते, असंही असोसिएटेड प्रेसनं त्या अधिकाऱ्याच्या हवाल्यानं वृत्त दिलं आहे. कॅमेरूनचा ध्वज असलेल्या 'एम/व्ही लुटुफ' या जहाजावर १० सदस्यांचा क्रू होता. त्यामध्ये सहा भारतीय, एक तुर्की नागरिक, एक जॉर्जियन नागरिक आणि दोन सर्बियन सुरक्षा रक्षकांचा समावेश आहे, असंही त्या अधिकाऱ्यानं सांगितलं.

## राहुल गांधींच्या पुण्यातल्या कार्यक्रमापूर्वी तणाव:'एनएसयूआय' आणि 'एबीव्हीपी' कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा; युवा काँग्रेसचे धरणे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम शनिवारी (दि. २२) पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. शिवाजीनगर येथील 'एसएसपीएमएस' प्रशालेच्या मैदानावर दुपारी साडेचार ते रात्री साडेनऊ या वेळेत हा कार्यक्रम पार पडणार आहे. पुणे पोलिसांनी या कार्यक्रमाला काही अटी आणि शर्तींसह परवानगी दिली असून, कार्यक्रमस्थळी कोणतेही आक्षेपार्ह फलक, चित्र लावू नयेत तसेच धार्मिक भावना दुखावणारी वक्तव्ये करू नयेत, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी रात्री उशिरा काँग्रेस (एनएसयूआय) आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी) यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. सीओईपी महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या परिसरात दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली आणि जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दोन्ही बाजूंचे समर्थक आक्रमक झाल्याने तणाव निर्माण झाला होता, मात्र पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या ठिकाणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार देखील दाखल झाले आहेत.

माध्यमांना प्रतिक्रिया देताना विजय वडेट्टीवार म्हणाले, दोन मुलींना कोंडून ठेवले. -इतझ च्या गुंडांनी तिला डांबून ठेवले, तिला धमकावले, मारहाण केली. त्या मुलीच्या भावाने फोन केल्यानंतर आमच्या युवा काँग्रेसच्या काही मुली इथे आल्या, न्याय मागायला. ज्या दोन अनाथ मुलींना ज्या पद्धतीने हुकुमशाही, दादागिरी करण्याचे काम केले. उद्याच्या राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाला गालबोट लावण्याचे तसेच कार्यक्रम उद्ध्वस्त करण्याचे हे षड्यंत्र असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केला. तसेच जोपर्यंत त्या मुलींना मारहाण करणाऱ्यांवर कारवाई होत नाही, तसेच ज्या पोलिसांनी लाठीचार्ज केला त्यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत आम्ही इथून जाणार नसल्याचा इशारा वडेट्टीवार यांनी दिला आहे. यावेळी काँग्रेस नेते सतेज पाटील, विश्र्वजित कदम देखील दाखल झाले असून काँग्रेस कार्यकर्त्यांसह विद्यार्थी व नेते धरणे आंदोलनाला बसले आहेत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या काही कार्यकर्त्यांनी सीओईपी महाविद्यालयाच्या परिसरात जाऊन राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाला उपस्थित न राहण्याबाबत तरुणांना धमकावल्याचा गंभीर आरोप युवक काँग्रेसकडून करण्यात आला आहे; या प्रकारानंतर काँग्रेसचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाल्याने परिसरात मोठा गोंधळ उडून परिस्थिती अधिकच चिघळल्याचे पाहायला मिळाले.

### CJP च्या आशुतोष यांच्या टीमला मारहाण; राजस्थानातील सरकारी शाळेची तपासणी करताना हाणामारी, गाडी फोडली

दैनिक आपला विदर्भ

**जयपूर । वृत्तसंस्था :** राजस्थानची राजधानी जयपूरच्या बगरू भागात रामपुरा कंवरपुरा गावातील एका सरकारी शाळेवरून जोरदार राडा झाला. कॉक्रोज जनता पार्टीने स्कूल ठीक करो ही मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत पक्षाचे कार्यकर्ते सरकारी शाळेत जाऊन शाळांच्या अवस्थेचे ऑडिट करत आहेत.

मात्र राजस्थानमध्ये या मोहिमेला हिंसक वळण लागलं. सीजेपी प्रवक्ता आशुतोष रांका यांनी सांगितलं की त्यांच्या टीममधील साथीदारांवर भाजप कार्यकर्त्यांनी हल्ला केला. त्यांची गाडी फोडली.

सकाळी सकाळी जयपूरमधील रामपुरा आणि कंवरपुरा गावातील प्राथमिक शाळेत सीजेपी कार्यकर्ते तपासणी करण्यासाठी पोहचले. गावातील काही लोकांनी याचा विरोध केला. त्यानंतर सीजेपीचे कार्यकर्ते तिथून निघून गेले थोड्या वेळाने आशुतोष रांका स्वतः या शाळेत पोहचले. त्यानंतर काही लोकांनी त्यांच्याविरूद्ध घोषणाबाजी केली. हळूहळू वातावरण तणावपूर्ण होऊ लागले. अचानक हाणामारी सुरू झाली. गावातील कार्यकर्त्यांनी सीजेपीच्या कार्यकर्त्यांविरूद्ध मारहाण केली. त्यांना गावातून पळून जाण्यास भाग पाडलं अन् गाडीच्या काचा देखील फोडल्या. काही ठिकाणी दगडफेक आणि माती देखील सीजेपीच्या कार्यकर्त्यांवर टाकण्यात आली.

अभिजीत दिपकेने सोशल मीडिया प्लॅटफॉर्वर एक पोस्ट करत या घटनेवर प्रतिक्रिया दिली. त्याने, 'आशुतोषवर भाजपच्या गुंडांनी राजस्थानमध्ये हल्ला केला. राजस्थान पोलिसांनी असं करू दिलं.

आशुतोष यांनी ज्यावेळी त्यांच्या कार्यकर्त्यांना वाईट वागणूक देण्यात येत होती त्यावेळी सोशल मीडियावर आरोप केला की गावात गावकरी नाही तर भाजपचे गुंड आणले गेले होते. या गुंडाचा म्होरक्या कमल प्रधान गरीबांच्या जमिनीवर कब्जा करण्याचे काम करतो. रांकाने ज्यावेळी हा प्रकार घडला त्यावेळी तो तिथंच होता आणि त्यांच्यासोबत देखील भाजप कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचा दावा केला.

## पॅलेट गन प्रकरण : अखेर राहुल गांधींच्या ठिय्या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांकडून एफआयआर दाखल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपूर्वी दिल्लीतील जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पॅलेट गनमुळं जखमी झालेला विद्यार्थी साहिल लोछाव याच्या संदर्भात तक्रार दाखल करण्यासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी शुक्रवारी (२१ ऑगस्ट) संसद मार्ग पोलीस ठाण्यात पोहोचले. यावेळी, सुरुवातीला यासंदर्भातील एफआयआर पोलिसांनी दाखल करून घेतली नाही. त्यामुळं राहुल गांधी यांच्यासह साहिलच्या कुटुंबीयांनी संसद मार्ग पोलीस ठाण्याबाहेर ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन केलं. यानंतर जवळपास पाच तासांच्या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींची मागणी मान्य केली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे.

राहुल गांधी यांनी संसद मार्ग पोलीस ठाण्यातील पोलीस उपआयुक्तांच्या (डीसीपी) कार्यालयात दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. दरम्यान, नीट परीक्षेतील अनियमिततेवरून २० जुलै रोजी झालेल्या विद्यार्थी आंदोलनात कथित पोलीस कारवाई करण्यात आली होती. याविरोधात तक्रार दाखल करावी, अशी मागणी



राहुल गांधी यांनी केली. सुरुवातीला यासंदर्भातील एफआयआर पोलिसांनी दाखल करून घेतली नाही. त्यामुळं राहुल गांधी यांच्यासह साहिलच्या कुटुंबीयांनी संसद मार्ग पोलीस ठाण्याबाहेर ठाण्याबाहेर ठिय्या मांडला. काँग्रेस खासदार प्रियांका गांधीही या आंदोलनात सामील झाल्या. याचबरोबर, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, सलमान खुर्शीद आणि इतरही संसद मार्ग पोलीस ठाण्यात दाखल झाले. यानंतर जवळपास पाच तासांच्या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींची मागणी मान्य केली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. डीसीपी सचिन शर्मा यांनी जयराम रमेश यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर पोलिसांनी राहुल गांधींची तक्रार नोंदवून घेण्यात आल्याचं आणि तपास अधिकाऱ्याला तक्रारीची माहिती देण्यात आल्याचं सांगण्यात आलं.

यापूर्वी पोलीस ठाण्यात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, २० जुलै रोजी कनॉट प्लेसमध्ये पॅलेट गनचा वापर करण्यात आला. एम्सच्या अहवालात स्पष्टपणं नमूद आहे की, साहिलच्या शरीरात २०० हून अधिक छर्रे आहेत आणि तीन छर्रे त्याच्या डोळ्यात आहेत. त्या डोळ्याची दृष्टी गमावली आहे. त्याच्या हृदयाजवळही छर्रे आहेत, ज्यांना स्पर्श करता येत नाही. दिल्ली पोलिसांचं म्हणणं आहे की, त्यांनी पॅलेट गनचा वापर केला नाही. मग, प्रश्र्न एकच उरतो की, हे कोणीतरी केलेच असणार... गुन्हा नक्कीच घडला आहे... एफआयआर दाखल करण्याची आमची मागणी आहे. तसंच पोलिसांनी आम्हाला सांगितलं की, त्यांना वरिष्ठांकडून आदेश मिळाले आहेत आणि ते एफआयआर दाखल करू शकत नाहीत. जोपर्यंत एफआयआर दाखल होत नाही, तोपर्यंत आम्ही येथून जाणार नाही... आम्हाला फक्त या कुटुंबासाठी न्याय हवा आहे... या देशात, अमित शाह यांचे गृह मंत्रालय आणि दिल्ली पोलीस न्याय मिळू देणार नाहीत...

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा सदस्य मुकुल वासनिक यांनी 'ईटीव्ही भारत'ला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत, या संपूर्ण घटनेवरून सरकार आणि पोलीस प्रशासनावर टीका केली. दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या क्रूर लाठीचार्ज आणि पॅलेट गनच्या वापराचा आदेश कोणत्या व्यक्तीनं किंवा कायद्यानं दिला, असा तीव्र प्रश्र्न मुकुल वासनिक यांनी उपस्थित केला. तसंच इतके दिवस उलटूनही, विद्यार्थ्यांना लक्ष्य का करण्यात आलं? याचे ठोस उत्तर देण्यास प्रशासन अजूनही टाळाटाळ करत आहे, असा आरोप मुकुल वासनिक यांनी केला.

## 'आयफोन १५ प्रो घेऊन देतो, खाली ये' ३ तास विनवण्या करूनही कुणालनं ऐकलं नाही

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगरमधील तिसगाव परिसरात आज दुपारी एका मुलासह आई-वडिलांचा दरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाला. या तिघांच्या मृत्युला आयफोन कारणीभूत ठरल्याची प्राथमिक माहिती आहे. आयफोनचा ईएमआय भरण्याच्या कारणावरून झालेल्या वादानंतर संबंधित मुलाने आई-वडिलांना दरीत उडी मारून आत्महत्येची धमकी दिली. मात्र, त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात मुलासह वडीलही दरीत पडले. त्यानंतर आईनेही दरीत उडी घेत जीवनयात्रा संपवली.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल चंदगुडे (वय, १८) असे संबंधित तरुणाचे नाव आहे. कुणालने काही दिवसांआधी आयफोन खरेदी केला. या मोबाईलचा ईएमआय भरण्यासाठी तो घरच्यांकडे पैशांची मागणी करत होता. यावरून कुणाल आणि त्याचे वडील मुरलीधर चंदगुडे यांच्यात जोरदार वाद झाला. या वादानंतर रागाच्या भरात कुणाल सकाळी १० वाजण्याच्या सुमारास वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तिसगाव येथील टेकडीवर जाऊन बसला आणि आत्महत्येची धमकी देऊ लागला.

मुलाला कड्यावर पाहून त्याचे आई-वडील, पोलीस, अग्निशामक दल आणि स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले. तिसगावचे माजी सरपंच संजय जाधव यांच्यासह उपस्थितांनी सुमारे तीन तास त्याची मनधरणी केली. त्याला तुला आयफोन १५ प्रो घेऊन देतो, खाली ये अशी ऑफरही देण्यात आली. परंतु, कुणालने कुणाचेही ऐकले नाही आणि तो आत्महत्या करण्याच्या निर्णयावर ठाम राहिला.

दरम्यान, दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मुलाला सुरक्षित खाली आणण्यासाठी वडील मुरलीधर चंदगुडे स्वतः त्याच्याजवळ गेले. त्यांनी कुणालचा हात पकडून त्याला मागे ओढण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुणालने दिलेल्या झटक्यामुळे दोघांचाही तोल गेला आणि बाप-लेक खोल दरीत कोसळले. आपल्या डोळ्यांदेखत पती आणि मुलाला दरीत कोसळताना पाहून मानसिक धक्का बसलेल्या आई संगीता चंदगुडे यांनीही क्षणाचाही विचार न करता दरीत उडी घेतली. या भीषण दुर्घटनेत तिघांचाही जागीच मृत्यू झाला. ही संपूर्ण घटना



उपस्थितांच्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र हळहळ आणि शोककळा पसरली आहे.

# तुपकरांचा पुन्हा एल्गार; २७ ऑगस्टला मुंबईत मंत्र्यांचे बंगले-गाड्यांच्या प्रतीकात्मक लिलावाचा इशारा

## नियमित कर्जदारांना २ लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्या; आयटीआर भरणारे, पुनर्गठित कर्जदार आणि २०१९ पूर्वीचे वंचित शेतकरीही कर्जमाफीच्या कक्षेत आणण्याची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर शेतकरी नेते तथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी दूर करून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा, या मागणीसाठी २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मुंबईत आंदोलनाचा इशारा तुपकरांनी दिला आहे.

पुढील सात दिवसांत सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर मंत्रालय परिसरातील मंत्र्यांचे बंगले व शासकीय वाहने जप्त करून त्यांचा प्रतीकात्मक जाहीर लिलाव करण्याचा इशारा तुपकरांनी दिल्याने कर्जमाफीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

**नियमित कर्जदारांना २ लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्या**

कर्जमाफी योजनेत थकीत कर्जदारांना दिलासा मिळत असताना नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देणे अन्यायकारक असल्याचे तुपकरांनी म्हटले आहे. नियमित कर्जदारांना ५० हजारांऐवजी २ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. ''नियमित कर्ज भरून आम्ही गुन्हा केला आहे का?'' असा सवाल त्यांनी सरकारला केला.

**वंचित शेतकऱ्यांनाही कर्जमाफी द्या**

आयटीआर भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवू नये, अशी मागणी तुपकरांनी केली आहे. तसेच २०१७ व २०१९ च्या कर्जमाफी योजनांमधून वंचित राहिलेले पात्र शेतकरी, पुनर्गठित कर्जामुळे कर्जमाफीपासून दूर राहिलेले शेतकरी आणि पूर्वीच्या योजनांमध्ये तांत्रिक कारणांमुळे लाभ न मिळालेले पात्र शेतकरी यांचाही २०२६ च्या कर्जमाफी योजनेत समावेश करावा, अशी मागणी त्यांनी केली.

बँकांनी काही शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कर्जाचे पुनर्गठन केल्याचा आरोपही तुपकरांनी केला आहे.

**मयत शेतकऱ्यांच्या वारसांना लाभाची मागणी**

कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या मात्र मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या कायदेशीर वारसांनाही कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी तुपकरांनी केली आहे. पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबांवरील कर्जाचा भार कमी करण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

**ओटीएसनंतर सिबिल स्कोअरचा प्रश्न**

तडजोडीच्या ओटीएस प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचा सिबिल स्कोअर खराब होऊ नये, यासाठी सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी चर्चा करून स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणीही तुपकरांनी केली. कर्जमाफी किंवा तडजोडीच्या प्रक्रियेनंतर भविष्यात गृहकर्ज, व्यवसाय कर्ज अथवा अन्य कर्ज मिळण्यात शेतकऱ्यांना अडचणी येऊ नयेत, याची सरकारने काळजी घ्यावी, अशी त्यांची भूमिका आहे.

**पैसे नसतील तर मंत्र्यांचे बंगले-गाड्या विकून कर्जमाफी करा**



शेतकरी कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानासाठी सरकारकडे पैसे नसतील, तर मंत्र्यांचे बंगले आणि शासकीय वाहने विकून त्यातून मिळणारा निधी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी वापरावा, अशी संतप्त भूमिका तुपकरांनी घेतली. मागण्यांवर सात दिवसांत निर्णय न झाल्यास २७ ऑगस्टला मुंबईत आंदोलनाचा पुढील टप्पा सुरू करून मंत्र्यांचे बंगले व शासकीय वाहने जप्त करून प्रतीकात्मक जाहीर लिलाव करण्याचा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, जून महिन्यातील अन्नत्याग आंदोलन, मुंबईतील विधानभवनासमोर सोयाबीन व कापूस आंदोलन तसेच कार्यकर्त्यांनी केलेल्या विविध आंदोलनांनंतर तुपकर आणि त्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली होती. काही मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली असली तरी कर्जमाफीतील अनेक प्रश्न अद्याप कायम असल्याचा दावा तुपकरांनी केला आहे.आता २७ ऑगस्टच्या आंदोलनापूर्वी सरकार शेतकऱ्यांच्या मागण्यांवर कोणता निर्णय घेते, याकडे राज्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

---

## वृत्तविशेष...

### कोळशापासून मिळणार गॅस, आंध्रात उभारणार भूमिगत प्रकल्प, ३० वर्षांत २.७३ लाख कोटींची गुंतवणूक

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली : हायड्रोजन, मिथेन, खते, सिंथेटिक नैसर्गिक वायुवरील विदेशी अवलंबित्व कमी करण्यासाठी कोळशापासून गॅस तयार केला जाणार आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजने आंध्र प्रदेशात भूमिगत कोल गॅसिफिकेशन प्रकल्पाची वसाहत उभारण्याचा प्रस्ताव दिला असून, पुढील ३० वर्षांत २.७३ लाख कोटी रुपयांची गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

देशामध्ये कोळशाचे विपुल साठे असूनही भारताला गॅस आणि इतर रासायनिक घटकांसाठी आयातीवर अवलंबून राहावे लागत आहे. याशिवाय खतनिर्मितीसाठी लागणाऱ्या घटकांसाठी देखील आयातीवरील अवलंबित्व आहे. रिलायन्सने कोळसा मंत्रालयाच्या ई-लिलावाद्वारे आंध्र प्रदेशातील चिंतालापुडी आणि रेचेरला हे कोळसा खाणपट्टे मिळवले आहेत. एलुरू जिल्ह्यात एकात्मिक भूमिगत कोळशापासून गॅसनिर्मितीचा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

असा आहे खाणपट्ट्याचा आकार...

आंध्र प्रदेशातील चिंतालापुडी येथील कोळशाचा खाणपट्टा सुमारे ३ हजार एकरमध्ये पसरला असून, तिथे ९०.४९ कोटी टन 'जी-१२' दर्जाचा कोळसा असल्याचा अंदाज आहे. तर, रेचेरला खाणपट्टा ५,५०० एकरचा असून, तिथे २२२.५ कोटी टन 'जी-१३' दर्जाचा कोळसा असल्याचा अंदाज आहे. या दोन्ही साठ्यांचे एकूण प्रमाण ३.१३ अब्ज टन इतके असून, हे साठे जमिनीखाली अर्धा किलोमीटरपेक्षा जास्त खोलीवर आहेत.

आयातीवर २.७७ लाख कोटी खर्च...

सिनगॅसपासून तयार होणाऱ्या 'रिड्यूसिंग गॅस'चा औद्योगिक कामांसाठीही वापर होऊ शकतो. त्यामुळे कोळशाचे महत्त्व केवळ वीजनिर्मितीपुरते मर्यादित नाही. कोळशाचे रूपांतर वायुरूप कच्च्या मालात केले जात आहे. त्याचा वापर विविध औद्योगिक साखळ्यांमध्ये होऊ शकतो. सरकारी प्रसिद्धिपत्रकानुसार, कोळसा गॅसिफिकेशनद्वारे एलएनजी, युरिया, अमोनियम नायट्रेट, अमोनिया, कोकिंग कोल आणि मिथेनॉलला पर्याय मिळू शकतो. या पदार्थांच्या आयातीवर भारताने २०२५ या आर्थिक वर्षात सुमारे २.७७ लाख कोटी रुपये खर्च केले आहेत.

भारतासाठी हे का महत्त्वाचे आहे?

भारताचे आयातीत गॅसवरील अवलंबित्व खूप मोठे आहे. मे २०२६ मध्ये सरकारने दिलेल्या माहितीनुसार, भारताची निम्म्याहून अधिक द्रवरूप नैसर्गिक वायूची (एलएनजी) गरज, युरियाची सुमारे २० टक्के, अमोनियाची जवळपास संपूर्ण आणि मिथेनॉलची सुमारे ८० ते ९० टक्के गरज आयातीद्वारे पूर्ण केली जाते. कोळशापासून गॅस बनविण्याच्या प्रक्रियेद्वारे सिंथेटिक नैसर्गिक वायू (एसएनजी) चे उत्पादन करून एलएनजीची मागणी कमी करता येऊ शकते. यातून अमोनिया आणि खत उत्पादनासाठी हायड्रोजन मिळू शकतो. मिथेनॉलच्या उत्पादनामुळे आयातीवर अवलंबून राहण्याची गरज कमी होऊ शकते.

असा आहे प्रस्ताव...

या प्रस्तावाचे तीन टप्पे असून, २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीपासून (जुलै-सप्टेंबर) ते २०२७ च्या अखेरीस चालणाऱ्या शोध आणि प्रायोगिक कामासाठी ३ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. जर हे काम यशस्वी झाले, तर रिलायन्स २०२८-३० या काळात १.२ लाख कोटी रुपये आणि २०३० पासून सुरू होणाऱ्या उत्पादन टप्प्यात १.५ लाख कोटी रुपये विकासावर खर्च करेल, असे आंध्र प्रदेश सरकारला सादर केलेल्या प्रस्तावात म्हटले आहे.

---

## बिबीत धाडसी घरफोडी; ६९ हजारांचा सोन्याचा ऐवज लंपास

**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील बिबी येथे अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा व चॅनल गेट तोडून घरात प्रवेश करत लोखंडी कपाट फोडून तब्बल ६९ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज लंपास केल्याची घटना शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री ते पहाटेच्या सुमारास घडली. घरात पाच व्यक्ती उपस्थित असतानाही झालेल्या या घरफोडीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे





वातावरण निर्माण झाले आहे.

बिबी येथील वैभव खुशालराव नागरे (वय ३२) यांच्या घरी चोरट्यांनी ही धाडसी चोरी केली. अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा तसेच चॅनल गेट तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर लोखंडी कपाट फोडून त्यातील १२ ग्रॅम वजनाची गहुमणी पोत, अंदाजे ६० हजार रुपये किमतीची, तसेच १० ग्रॅम वजनाची सोन्याची एकदाणी, अंदाजे ९ हजार रुपये किमतीची, असा एकूण ६९ हजार रुपयांचा सोन्याचा ऐवज चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच बिबी पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून तपासासाठी बुलढाणा येथील श्वान पथक व ठसेतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. चोरट्यांचा माग काढण्यासाठी पोलिसांकडून विविध दिशेने तपास सुरू आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार गजानन सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी राजेंद्र कुटे करीत आहेत. दरम्यान, बिबी परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. घरफोडी करणाऱ्या चोरट्यांना जेरबंद करण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

---

## राखी पाठविण्यासाठी रविवारीही प्रमुख पोस्ट ऑफिस राहणार खुले

### बुलडाणा जिल्ह्यातील नऊ डाकघरांत २३ ऑगस्टला राखी बुकिंगची सुविधा; स्पीड पोस्टवर १० टक्के सवलत

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** रक्षाबंधनाचा सण जवळ आल्याने भावाला वेळेत राखी पाठविण्यासाठी बहिणींची लगबग सुरू झाली आहे. ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेऊन बुलडाणा डाक विभागाने विशेष व्यवस्था केली असून, रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्यातील प्रमुख पोस्ट ऑफिस राखी बुकिंगसाठी खुले ठेवण्यात येणार आहेत.

बुलडाणा प्रधान डाकघर, खामगाव प्रधान डाकघर, चिखली उप डाकघर, शेगाव उप डाकघर, मलकापूर उप डाकघर, नांदुरा उप डाकघर, देऊळगाव राजा उप डाकघर, मेहकर उप डाकघर आणि जळगाव उप डाकघर येथे रविवारी राखी बुकिंगची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

स्पीड पोस्टवर १० टक्के सवलत : राखी जलद, सुरक्षित आणि विश्वासार्ह पद्धतीने प्रिय व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी डाक विभागाने स्पीड पोस्टची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. रक्षाबंधनानिमित्त राखी पाठविण्यासाठी स्पीड पोस्ट दरावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे. परदेशातही पाठविता येणार राखी : परदेशात राहणाऱ्या भावंडांनाही राखी पाठविण्याची सुविधा डाक विभागाने उपलब्ध करून दिली आहे. भारतीय डाक विभागाच्या आंतरराष्ट्रीय टपाल सेवेद्वारे माफक दरात राखी परदेशात पाठविता येणार आहे. तसेच राखी पाठविण्यासाठी विशेष राखी लिफाफेही पोस्ट ऑफिसमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा धागा वेळेत आणि सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी नागरिकांनी स्पीड पोस्ट, आंतरराष्ट्रीय टपाल सेवा आणि १० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाकघर अधीक्षक गजेंद्र जाधव यांनी केले आहे.

---

## लोकशाही वाचवण्यासाठी तरुणांनी पुढे येऊन नेतृत्व स्वीकारावे, ही राहुल गांधींची भूमिका - नाना पटोले

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे । प्रतिनिधी :** राहुल गांधी यांचा पुण्यातील छात्रो की गुंज हा कार्यक्रम शिक्षणाच्या बाजारीकरणा विरोधातील एक एल्गार आहे. पुणे ही महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचारांची भूमी असल्याने पुण्यातून परिवर्तनाची मशाल पेटली जाणार आहे, असे मत काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा शनिवारी (दि. २२)) पुण्यात 'छात्रों की गूंज' हा कार्यक्रम होत आहे. या पार्श्र्वभूमीवर काँग्रेस भवन येथे शुक्रवारी नाना पटोले यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी ते बोलत होते. माजी राज्यमंत्री डॉ. विश्र्वजीत कदम, काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, पश्र्चिम विभागाच्या शहराध्यक्षा दीप्ती चवधरी, महापालिकेतील गटनेते चंदू कदम आदी उपस्थित होते.

पटोले म्हणाले, राहुल गांधी पुण्यात विद्यार्थ्यांशी आणि विशेषतः विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, शिक्षणातील समस्या आणि भविष्यातील प्रश्र्न समजून घेणार आहेत. हा संवाद केवळ पुण्यापुरता मर्यादित नसून देशातील विद्यार्थ्यांच्या प्रश्र्नांना वाचा फोडणारा आहे. लोकशाही वाचवण्यासाठी 'जेन-झी' आणि तरुणांनी पुढे येऊन नेतृत्व स्वीकारले पाहिजे, ही राहुल गांधींची भूमिका आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्र्न ऐकून घेण्याबरोबरच ते संसदेत मांडणे आणि सरकारला जाब विचारणे, हा राहुल गांधींच्या संवादा मागील उद्देश आहे.

राहुल गांधींचा पुण्यातील विद्यार्थी संवाद हा काँग्रेसचा राजकीय कार्यक्रम नसून, देशातील पुढील पिढीचे भवितव्य वाचविण्यासाठी राजकारणाच्या पलीकडे जाऊन आयोजित केलेला संवाद आहे. कार्यक्रमाच्या मंचावर कोणताही राजकीय नेता नसेल. राहुल गांधी हे केवळ लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले.

---

## डागा रुग्णालयातून नवजात बाळ पळवलं, पोलिसांनी काही तासातच लावला छडा

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर । प्रतिनिधी :** रुग्णालयात आलेल्या बुरखाधारी महिलेने प्रसूतीनंतर अवघ्या काही तासांच्या नवजात मुलीला पळवून नेल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी सकाळी डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालयात घडली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी अवघ्या काही तासातच आरोपी महिलेचा छडा लावला. तिच्या ताब्यातून चिमुकलीची सुखरूप सुटका करून तिला आईच्या कुशीत सोपविण्यात आले.

शहरभर खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणाची माहिती अशी, गोळीबार चौकाजवळ राहणाऱ्या प्रभा शक्ती पाठराबे (वय ३०) यांना प्रसूतीसाठी १९ ऑगस्ट रोजी सकाळी डागा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. २१ ऑगस्टच्या पहाटे त्यांची सामान्य प्रसूती झाली. त्यांनी एका मुलीला जन्म दिला. प्रसूतीनंतर त्यांना लेबर रूममधून तिसऱ्या मजल्यावरील वॉर्ड क्रमांक ९ मध्ये हलविण्यात आले. शुक्रवारी सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास बुरखा घातलेली अनोळखी महिला पाठराबे यांच्या नातेवाइकांकडे गेली.

नवजात बाळाला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळतो, त्यासाठी अर्ज करावा लागतो, असे सांगून तिने पाठराबे कुटुंबीयांचा विश्र्वास संपादन केला. यानंतर तिने प्रसूत महिलेसोबत असलेल्या वृद्धेला चिमुकलीसह सोबत घेऊन बाह्यरुग्ण विभागाकडे (ओपीडी) चालण्यास सांगितले. वृद्धेची नजर चुकवून ती चिमुकलीसह गायब झाली. बराच वेळ प्रतीक्षा करूनही ती महिला परत न आल्याने कुटुंबीयांनी रुग्णालयाच्या विविध भागांत शोधाशोध केली. मात्र, ती दिसली नाही. त्यामुळे चिमुकलीला पळवून नेल्याचा संशय आल्याने कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासनाला माहिती दिली. प्रशासनाने पोलिसांना कळविले. चिमुकली चोरीला गेल्याचे कळताच



संग्रहीत छायाचित्र

पोलिस उपायुक्त राहुल मदने यांच्यासह कोतवाली, गणेशपेठ पोलिसांचा ताफा रुग्णालयात पोहोचले. सर्वत्र शोधाशोध सुरू झाली.

पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यात संशयित बुरखाधारी महिला एका ऑटोत बसताना दिसली. हा धागा पकडून पोलिसांनी तिचा पाठलाग करत यशोधरानगरातील तिचे घर शोधून काढले. तेथे महिलेच्या ताब्यातून चिमुकलीची सुखरूप सुटका करण्यात येऊन तिला आईच्या कुशीत सोपविण्यात आले.

**कुटुंबीयांचा रुग्णालय प्रशासनावर रोष**

चिमुकली चोरीला गेल्यानंतर तिच्या मातेने एकच आक्रोश सुरू केला. दुसरीकडे या घटनेची माहिती मिळाल्याने पाठराबे यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी रुग्णालय प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धारेवर धरत तीव्र संताप व्यक्त केला. नवजात बाळाचा तातडीने शोध घेण्याची मागणीही नातेवाइकांनी लावून धरली होती. चिमुकली मिळाल्याचे कळताच पाठराबे कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

**म्हणून केला गुन्हा**

या प्रकरणातील आरोपी महिलेचे नाव आशियाना अंजूम सय्यद अल्ताफ आहे. ती छत्रपती संभाजीनगरात राहते. यशोधरानगरात तिचे माहेर आहे. ३ ऑगस्टला तिची प्रसूती झाली आणि ११ ऑगस्टला तिचे बाळ दगावल्याने तिची मानसिक अवस्था बिघडली. या स्थितीत तिने हे कृत्य केले. पोलिस आल्याचे पाहून बाळाला घेऊन ती पळत सुटली. पाय अडखळल्याने खाली पडून ती जखमीदेखील झाली. तिला मेयोत दाखल करण्यात आले आहे.